speed post

जा. नं. श्रीछशिम/2020-21/99 दि. 6/7/2020

प्रति,
मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण कार्यालय, अहमदनगर.

विषयः - माहिती अधिकार कायदा २००५ अनुसार माहिती उपलब्ध करून देणेबाबत.
संदर्भः - आपले पत्र क्र. जिव्यशिवप्रअअ/अ-२/२०२०/६१८ दि. ०६.०७.२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आमचे कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील दि. ०१.०१.२०१६ ते १५.०७.२०१९ या कालावधीमध्ये कोणताही कर्मचारी सेवानिवृत्त झालेला नाही. त्यामुळे सदरबाबतची आमचे महाविद्यालयाची माहिती निरंक समजण्यात यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबतः - प्रमाणपत्र.

प्राचार्य
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय
(कला, विज्ञान, व वाणिज्य)
श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

O/C

जा.नं. श्रीछशिम/2020-21/99          दि. 7/7/2020

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आमचे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा या कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकडील कार्यासनावर नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांपैकी दि. ०१.०१.२०१६ ते दि. १५.०७.२०१९ या कालावधीत कोणीही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले नाहीत. तरी सदरबाबतची आमचे महाविद्यालयाची माहिती निरंक समजण्यात यावी.

**स्थळः - श्रीगोंदा.**

**दिनांकः - ०७.०७.२०२०.**

प्राचार्य
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय
(कला, विज्ञान, व वाणिज्य)
श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अ. नगर

O/C

महाराष्ट्र शासन
**जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,अहमदनगर यांचे कार्यालय,**
**व्दारा- शासकीय तांत्रिक विद्यालय, स्टेशनरोड, अहमदनगर.**
**Email Address -** Dveto.Ahmadnagar@dvet.gov.in ☎- 0241 -2359947

**कालमर्यादित**

जा.क्र.जिव्यशिवप्रअअ/अ-२/२०२०/६१८ दिनांक- ०६ /०७ /२०२०

प्रति,
प्राचार्य,
अशासकीय अनुदानित संस्था ( सर्व )
-----------------------------------------------
-----------------------------------------------
एच. एस. सी. व्होकेशनल / व्दिलक्षी / पुर्व व्यावसायिक
जि. अहमदनगर

विषय - माहिती अधिकार कायदा २००५ नुसार माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ - जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अहमदनगर यांचे पत्र जा. क्र. प्रशि / अ-२ / २०२० /६१३, दि. ०३/०७/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, श्री. रविंद्र जगन्नाथ वैद्य, सहाय्यक अधिव्याख्याता, जिजामाता माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, भेंडा, ता. नेवासा, जि. अहमदनगर यांनी तांत्रिक आणि अतांत्रिक संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचा-यांची खालील प्रकारची माहिती मागवली आहे.

"जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कार्यालय, अहमदनगर यांनी प्रादेशिक कार्यालयाकडे जमा करण्यात आलेल्या प्रत्येक सेवानिवृत्त कर्मचा-यांचा वेतननिश्चिती प्रस्तावाचा क्रमांक व दिनांक कर्मचा-यांचे नावासहित द्यावा." अशी माहिती मागवली आहे.

आपल्या कार्यासनावर दि. ०१/०१/२०१६ ते दि. १५/०७/२०१९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व तांत्रिक व अतांत्रिक कर्मचा-यांकडुन उपरोक्त माहिती श्री. रविंद्र जगन्नाथ वैद्य यांना द्यावयाची आहे किंवा नाही असा लेखी खुलासा प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पत्र मिळाल्यापासुन पाच दिवसात सादर करावा.

सदरची माहिती हि माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ११(२) नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने संबंधित कर्मचा-यांचे लेखी निवेदन, खुलासा घेणे बंधनकारक असून तो संबंधितास पाच दिवसात देणे क्रमप्राप्त आहे.

दि. ०१/०१/२०१६ ते दि. १५/०७/२०१९ या कालावधीत जर कोणीही कर्मचारी आपल्या कार्यासनावरुन सेवानिवृत्त झाला नसल्यास तरी याबाबतचे निरंक प्रमाणपत्र तात्काळ सादर करावे.

urgent
Shri. Bondeo / Shri. G.K. Nagawade
9/7/2020

Shri Chhatrapati Shivaji
Mahavidyalaya, Shrigonda
Inward No. 04
Date 8/6/2020

( अतुल म. ढाणके )
जनमाहिती अधिकारी
तथा
उपजिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, अहमदनगर